**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१८**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक-१ मंगळवार दिनांक २५/३/२००८

ठराव क्रमांक -१ मंगळवार दिनांक २५/३/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक १६ दिनांक १६/२/२००८ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक १७ दिनांक ११/३/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक १६ दिनांक १६/२/२००८ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक १७ दिनांक ११/३/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे साठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. तिवारी सु.र. :- मागिल सभेचे कार्यवृत्त कायम करणे साठीचा प्रस्ताव आहे मागिल सभे मधील विषय सांगावे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मागिल सभेची विषय पत्रिका दाखवावी.

त्या प्रमाणे विषय पत्रिका दाखविणेत आली.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब :- मागिल सभा दिनांक १६/२/२००८ रोजीचे सभेत एकूण वीस विषय व दिनांक ११/३/२००८रोजीचे सभेत एकुण पंधरा विषय होते ते बहुतेक निविदा दर मंजूरी विषयी होते मा. सदस्यांनी या विषय मंजूरी मध्ये काही दुरूस्त्या सुचना करणे असल्यास त्या दुरूस्त्या सुचना सांगाव्यात.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- मागिल सभेचे कार्यवृत्त मंजूर करणेत यावे.

मा.सौ. खरपुडे ज.सु. :- मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- मागिल सभांचे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करणेत यावे.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक १६ दिनांक १६/२/२००८ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक १७ दिनांक ११/३/२००८ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन

अनुमोदक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१८**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक-२ मंगळवार दिनांक २५/३/२००८

ठराव क्रमांक -२ मंगळवार दिनांक २५/३/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे अग्निशमन विभागाकरिता म.न.पा.ने पुरविलेल्या टाटा एलपीटी /१६१३/४२/६९७ टी सी आय सी व टाटा एलपीटी ७१२ इ एक्स /३८कॅब या चेसीस वर अनुक्रमे फोमटेंडर व वॉटर टेंडर बसविणेचे कामास व त्याकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दरास एकूण खर्चास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर** :- विषय-अहमदनगर महानगरपालिकेने पुरविलेल्या चेसीसवर १] फोम टेंडर २] वॉटर टेंडर बांधणी करणे बाबत.

संदर्भ - १] मा.उपायुक्त ( कर) यांचे दालनात झालेले निगोशिएशन.
२] दत्त मोटार बॉडी बिल्डर्स यांचे दि. १०/१/०८ चे पत्र.

मा.सादर,

अहमदनगर महानगरपालिकेने टाटा LPT /१६१३ /४२/६९७ TCIC या चेसीवर फोम टेंडर तसेच LPT ७१२EX /३८ कॅब चेसीवर वॉटर टेंडर बसविणे कामी, बसविणेकामी जाहिर निविदा दैनिक सामना या वृतपत्रामध्ये दि.१/१२/२००७ रोजी प्रसिध्द केले होते. निविदा फॉर्म विक्री दि. १/१२/२००७ ते दि. १५/१२/२००७ अशी ठेवण्यात आली असता एकूण ६ निविदाफॉर्म विक्री झाली होती. पैकी १] देवी फायर सर्व्हीसेस, सोलापूर २] सिरी टेकॉन हैदराबाद, ३] दत्त मोटार बॉडी बिल्डर्स अहमदबाद या तीन निविदा प्राप्त झाल्या असुन, प्राप्त निविदांचा तुलणात्मक तक्ता तयार केला असता दत्त मोटार बॉडी बिल्डर्स, अहमदबाद यांचे दर कमीचे आहेत. मनपा चा आर्थीक फायदा होण्याच्या दृष्टीने मो.व्हे. जा.नं. ४५३ दि. ४/१/०८ अन्वये दरांबाबत निगोशिएशन करणे कामी त्यांना बोलविण्यांत आले होते. मा.उपायुक्त ( कर) यांचे दालनात दि. १०/१/०८ रोजी चर्चा झाली असता, फोम टेंडर व वॉटर टेंडर बनविणे कामी दिलेले दर योग्य असल्याबाबत दत्त मोटार बॉडी बिल्डर्स यांनी पत्र देवून, दर यापेक्षा कमी करण्यास नकार दिला आहे.

तसेच फोम टेंडर बनविणे साठी LPT/१६१३/४२/६९७TCIC या चेसी घेणे कामी टाटा मोटर्स कं. लि. यांचे दर कमीचे असून रू. ८,११,७१६=७५ इतका खर्च येईल. व वॉटर टेंडर बनविणेकामी LPT ७१२/३८/६९७ TCIC चेसी घेणेकामी शुभयान मोटर्स यांचे दरपत्रक कमीचे असून रूपये ६,४५,२९५/- इतका खर्च येईल.

तरी फोम टेंडर बनविणे कामी-

१] टाटा LPT/१६१३/४२/६९७TCIC चेसी खरेदीकामी टाटा मोटर्स कं.लि. यांचे दरपत्रकानुसार येणारा खर्च रू. ८,११,७१६=०० तसेच बॉडी बांधकाम करणेकामी दत्त मोटार बॉडी बिल्डर्स यांचे निविदेनुसार येणारा खर्च रू. १७,१४,३६५/- इतका असून एकूण खर्च रू. २५,२६,०८१/- इतका आहे.

२] वॉटर टेंडर बनविणे कामी टाटा LPT/ ७१२/३८/Ex cab चेसी खरेदीकामी शुभयान मोटर्स यांचे दरपत्रकानुसार येणारा खर्च रूपये ६,४५,२९५/- तसेच बॉडी बांधकाम करणेकामी दत्त मोटार बॉडी बिल्डर्स यांचे निविदेनुसार येणारा खर्च रू. ९,२५,१५५/- इतका असून एकूण खर्च रू. १५,७०,४५०/- इतका आहे. तरी सदरबाबतच्या निविदेच्या संपूर्ण प्रक्रीयेस मा. निविदा छाननी समितीची मान्यता मिळालेली असून सदरच्या खर्चास व कामास मंजूरीस्तव मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे ऑटो इंजिनिअर मोटार व्हेईकल विभाग यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये॑ वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये॑ झालेली चर्चा.

श्री. तिवारी सु.रा.:- काल रात्री सात वाजता आम्हाला आज सकाळी ११ वा होणा-या सभेचा अजेंडा मिळालेला आहे. इतक्या अर्जंट मिटींग बोलावण्याची तातडी होती तर प्रशासनाने या प्रकरणी पूर्वीच कार्यवाही का? पुर्ण केली नाही सभा तीन दिवसासाठी तहकुब करावी असे सदस्यांचे पत्र दिलेले आहे.

मा.सभापती साहेब :- मा.आयुक्त साहेबांचे पत्रानुसार बाराव्या वित्त आयोगा अंतर्गत घनकचरा व्यवस्थापने अंतर्गत वाहन खरेदी करणे तसेच वाहनावर बॉडी बांधणे बाबत जाहिर निविदा प्रसिध्द केल्या असून आलेल्या निविदा उघडण्यांत आल्या आहेत सदरच्या निविदा बाबत तातडीने कार्यवाही करून उपयोगीता प्रमाणपत्र मा. शासनास सादर करावयाचे आहे. त्यासाठी तातडीने कार्यवाही होणे आवश्यक असलेने सदर ची सभा तातडीने बोलावण्यांत आलेली आहे.

मा.श्री. निकम साहेब पी.जे :- आज रोजीचे सदर अजेंडया वरील विषय क्रमांक तीन व चार प्रकरणीच्या निविदा या दि. १९/३/२००८ ला स्विकारणेत आल्या त्या लगेचच उघडणेत येउत्न प्रस्ताव तयार केलेला आहे. मार्च एन्ड पूर्वी सदर निधी खर्च होणे आवश्यक असल्याने तातडीने निर्णय व्हावा या करिता प्रस्ताव सभे पुढे सादर केला आहे.

मा.श्री.तिवारी सु.र.:-काल सांयकाळी सात वाजता आम्हास अजेंडा मिळाला तीन दिवस सभा तहकुब करावी.

मा.सौ. दिघे वि.रा. :- आम्हाला ही एका सभेचा रात्री ११.०० वा. अजेंडा मिळाला होता.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- प्रॉसिजर पूर्ण व्हावयास हवी शुक्रवारी दिला असता तर प्रोसिजर पूर्ण झाली असती या पुढे सभेचा अजेंडा हा कार्यालयीन वेळेतच सदस्यांना देणेत यावा.

मा.सभापती साहेब :- या पुढे ऑफिस वेळेतच अजेंडा वाटण्यांत यावा.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- एकुण खर्च व आलेल्या निविदांची माहिती सांगावी.

मॅके इंजि. श्री. निकम पी.जे. :- टाटा LPT १६१३ चे चेसी करिता टाटा मोटर्स कं.लि. यांचे दर पत्रका नुसार रू.८,११,७१६/- तसेच त्यावर केमीकल फोम टेंडर बॉडी बांधकाम करणे कामी दत्त मोटार बॉडी बिल्डर्स यांचे निविदे नुसार दर रू.१७,१४,३६५/- इतका असून टाटा १६१३ चेसी सह एकूण खर्च रू. २५,२६,०८१/- इतका आहे तसेच टाटा एलपीटी ७१२ चेसी खरेदी कामी शुभयान मोटर्स यांचे दरपत्रका नुसार रूपये ६,४५,२९५/- इतका दर आलेला असून त्या चेसी वर बॉडी बांधकाम करणे कामी दत्त मोटार बॅाडी बिल्डर्स यांचे निविदा नुसार येणारा खर्च रू. ९,२५,१५५/- इतका असुन चेसी सह एकुण खर्च रू.१५,७०,४५०/- इतका आहे. सदरचे येणारे खर्चास मंजूरीस्तव प्रस्ताव सभे पुढे सादर केलेला आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- चेसीवर बॉडी बांधकामाचा खर्च जास्त येतो आहे.?

मा.श्री. तिवारी सु.र. :- बॉडी बांधकामाचा खर्च जास्तच आहे.

मॅके. इंजि. श्री.निकम पी.जे.:- खर्च जास्त वाटत असेल तर फेर निविदा काढता येतील. पंरतु सध्या बाजारा मध्ये ४०% दर वाढ झालेली असून आलेले दर हे त्याप्रमाणात कमीचे आहेत. सभेचे निर्णयानुसार कार्यवाही करणेत येईल.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :-चेसीवर बॉडी  चे बांधकामाचे  कमीचे निविदा धारक यांचा अनुभव सांगावा.

मॅके.इंजि.श्री.निकम पी.जे.:-होय त्यांना अनुभव आहे सदरची कंपनी अहमदबादची असून तेथील म.न.पाचे काम त्यांनी केलेले आहे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :-  आपण कंपनी कडून चेसी खरेदी करतो आहोत कंपनी चेसी  वरील बॉडीचे बांधकाम करून देत नाही का? इतर न.पा, मनपा  मध्ये काय प्रोसिजर आहे.

मॅके.इंजि.श्री. निकम पी.जे.:- कंपनी बॉडी बांधून देत नाही अधिकृत डिलर कडून चेसी खरेदी केल्यानंतर आपले प्रोसिजर प्रमाणेच बॉडी बांधकाम निविदा मागवून करणेत येते. सगळी कडे अशीच पध्दत आहे.

मा.श्री. शेख आरिफ शे.र.:-  ऑफिस रिपोर्ट मंजूरी करावा.

मा.सौ. खरपुडे ज.सु. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे अग्निशमन विभागाकरिता म.न.पा.ने पुरविलेल्या टाटा एल.पी.टी. /१६१३/४२/६९७ टीसीआयसी व टाटा एलपीटी ७१२ इ एक्स/ ३८ कॅब या चेसीस वर अनुक्रमे फोम टेंडर व वॉटर टेंडर बसविणेचे कामास व त्या कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दरास, एकूण खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट पहाता स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक टाटा मोटर्स कंपनी लिमीटेड यांचे टाटा एलपीटी /१६१३/४२/६९७ टीसीआयसी चे चेसीचे रक्कम रूपये ८,११,७१६/-(रूपये आठ लाख आकरा हजार सातशे सोळा फक्त ) चे कमीचे दरास तसेच बॉडी बांधकाम करणे कामी कमीचे निविदा दर धारक दत्त मोटार बॉडी बिल्डर्स यांचे फोम टेंडर बांधणेचे रूपये १७,१४,३६५/-( रूपये सतरा लाख चौदा हजार तीनशे पासष्ठ फक्त) चे कमीचे दरास तसेच टाटा एलपीटी/७१२/३८/ इ एक्स कॅब चेसी चे स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक शुभयान मोटर्स यांचे रू.६,४५,२९५/-(रूपये सहा लाख पंचेचाळीस हजार दोनशे पंच्यान्नव फक्त) चे कमीचे दरास व सदर चेसीवर वॉटर टेंडर बॉडी बांधकामाचे स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक दत्त मोटार बॉडी बिल्डर्स यांचे रू.९,२५,१५५/-( रूपये नऊ लाख पंचवीस हजार एकशे पंचावन्न फक्त) चे दरास व सदर टाटा १६१३ व टाटा ७१२ चे चेसीसह वॉटर टेंडर व फोम टेंडर बांधणे कामी येणारे एकूण खर्च रूपये ४०९६५३१/-(रूपये चाळीस लाख शहाण्णव हजार पांचशे एकतीस फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन

अनुमोदक :- मा.सौ. खरपुडे जयश्री सुरेश

ऑफिस रिपोर्टा नुसार ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१८**
सन २००७-२००८.

विषय क्रमांक-३ मंगळवार दिनांक २५/३/२००८

ठराव क्रमांक -३ मंगळवार दिनांक २५/३/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य विभागा करिता घन कचरा व्यवस्थापने अंतर्गत १२ व्या वित्त आयोगाचे प्राप्त निधीतुन कचरा वाहतुकी करिता एकूण बत्तीस वाहनांच्या (टाटा ४०७ च्या पंधरा चेसी टाटा एसीई च्या पंधरा चेसी व टाटा ११०९ च्या दोन चेसी ) चेसीज खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ

**प्रस्तावाचा मजकूर :-** विषय-१२ व्या वित्त आयोगाचे प्राप्त निधीतून घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्राप्त निधीतून टाटा ४०७ वाहने पी.टी.ओ. सह १५ वाहने, टाटा एसीई बॉडी सह १५ वाहने टाटा ११०९ चेसी पी.टी.ओ. सह-२ वाहने घेणे बाबत.

मा.सादर,

आरोग्य विभागाकडील घनकचरा प्रस्ताव दि. १८/१/२००८ प्रस्तावास मा.स्थायी समिती ठराव क्र. १३ दि. ७/१/२००८ चे मंजूरीनुसार तसेच मा.उपसंचालक नगरपरिषद संचालनालय मुंबई यांचेकडील दि. २२ जाने. २००८ चे पत्रानुसार १२ व्या वित्त आयोगाचे प्राप्त निधीतून घनकचरा व्यवस्थापनेसाठी टाटा-४०७-१५ वाहने टाटा एसीई-१५ वाहने टाटा ११०९-२ वाहने व कंटेनर-२० नग घेणे असून फायर फायटर-२ वाहने महानगरपालिकेच्या निधीमधून खरेदी करणे प्रक्रिया चालू आहे.

वाहने खरेदी करणे बाबत जाहिर निविदा दैनिक गावकरी या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करणेत येवून मुदतीत दि. १९/३/०८ पर्यत प्राप्त निविदा मा.उपायुक्त यांचे दालनात निविदा धारक यांचे समक्ष उघडणेत येवून तुलनात्मक तक्ता केला असता.

१] टाटा ४०७ चेसी पी.टी.ओ. सह-प्रत्येकी रू.५,०७,०००/- प्रमाणे १५ वाहने-शुभयान मोटर्स, अहमदनगर निविदेनुसार रू. ७६,०५,०००/-

२] टाटा एसीई बॉडीसह प्रत्येकी रू.२,४४,५२६/- प्रमाणे -१५ वाहने-स्टर्लीग मोटर्स, नाशिक-निविदेनुसार रू. ३६,६७,८९०/-

३] टाटा ११०९ चेसी पी.टी.ओ.सह प्रत्येकी वाहन रू.७,०९,२७५/- प्रमाणे २ वाहने- स्टर्लीग मोटर्स, नाशिक निविदेनुसार रू.१४,१८,५५०/-

याप्रमाणे होते.

वरीलप्रमाणे दर दिले असता सदरचे प्रकरण मा. निविदा छाननी समिती दि. २४/३/२००८ ठेवले होते. निविदा छाननी समितीने मा.स्थायी समितीकडे सदरचा एकूण खर्च रू. १,२६,९१,४४०/- चे कामास शिफारस केलेली आहे. व मा.आयुक्त साहेब यांनी सदरच्या प्रस्तावास मान्यता दिलेली असून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाण मॅके. इंजिनिअर यांचा अहवाल असे. दि. २४/३/०८

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये॑ वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये॑ झालेली चर्चा.

मा.श्री. तिवारी सु.र. :- प्रस्तावाची माहिती द्यावी .

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- १२ व्या वित्त आयोगाचे घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्राप्त निधीतून टाटा ४०७ वाहने पीटीओ सह १५ वाहने, टाटा एसीई बॉडी सह १५ वाहने, टाटा ११०९ चेसी पी.टी.ओ सह २ वाहने घेणे बाबत निविदा मागविण्यांत आल्या होत्या तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या पैकी शुभयान मोटर्स अहमदनगर यांचे निविदे नुसार टाटा ४०७ करिता रू.५,०७,०००/- प्रत्येकी प्रमाणे १५ वाहनासाठी एकूण खर्च ७६०५०००/- २) टाटा एसीई बॉडी सह प्रमाणे १५ वाहने स्टर्लीग मोटर्स नाशिक यांचे निविदे नुसार रू. २४४५२६/- प्रमाणे १५ वाहनासाठी एकुण खर्च रू. ३६६७८९०/- व ३) टाटा ११०९ चेसी पीटी ओ सह प्रत्येंकी वाहन रू.७०९२७५/- प्रमाणे एकूण खर्च रू.१४१८५५०/- या प्रमाणे दर प्राप्त झाले असुन सदर निविदा दिनांक दि. १९/३/२००८ ला मागविण्यात आल्या त्याच दिवशी त्या उघडणेत येउन प्रस्ताव सभेपुढे मंजूरी साठी सादर केलेला आहे.सदर वाहन खरेदी कामांसाठी एकूण रू. १२६९१४४०/- चे खर्चास मंजूरीची शिफारस केलेली आहे. मा.शासनाचे पत्रानुसार सदर वाहने खरेदी करणे आहेत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- मा. शासनाने कळविल्या नुसार घनकचरा व्यवस्थापने अंतर्गत सदर वाहने कचरा वाहतुकीसाठी खरेदी करणे आहेत.

मा.सभापती साहेब :- सदर वाहनाचे खरेदी मधून मनपास किती डिस्काउन्ट मिळेल.

मॅके. इंजि.श्री. निकम पी.जे. :- प्रतेंकी वीस हजार प्रमाणे डिस्काउ न्ट मिळेल.

मा.श्री. शेख आरिफ. शे. र. :- प्रस्ताव मंजूर करावा.

मा.सौ. पवार स.बा. :- मंजूर करणेत यावा.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते प्रस्ताव मंजूर करणेत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य विभागाकरिता घनकचरा व्यावस्थापने अंतर्गत १२ व्या वित्त आयोगाचे प्राप्त निधीतून कचरा वाहतुकी करिता एकूण ३२ वाहनांच्या (टाटा ४०७ च्य पंधरा चेसी, टाटा एसीई च्या पंधरा चसी व टाटा ११०९ च्या दोन चेसी )चेसीज खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता कमीचे निविदा दरधारक **१]** शुभयान मोटर्स अहमदनगर यांचे टाटा ४०७ चेसी पीटीओ सह प्रतेंकी रूपये ५,०७,०००/-(रूपये पांच लाख सात हजार फक्त) प्रमाणे एकूण पंधरा वाहनाचे रूपये ७६,०५,०००/- (रूपये शहात्तर लाख पांच हजार फक्त) **२]** स्टर्लीग मोटर्स नाशिक यांचे टाटा एसीई बॉडी सह प्रतेंकी रूपये २,४४,५२६/- (रूपये दोन लाख चव्वेचाळीस हजार पांचशे सव्वीस फक्त) प्रमाणे एकूण पंधरा वाहनाचे रूपये ३६,६७,८९०/- (रूपये छत्तीस लाख सदुसष्ठ हजार आठशे नव्वद फक्त) तसेच **३]** टाटा ११०९ चेसी पीटीओ सह चे प्रतेंकी वाहन रूपये ७,०९,२७५/- (रूपये सात लाख नउ हजार दोनशे पंच्याहत्तर फक्त) प्रमाणे दोन वाहनाचे रूपये १४,१८,५५०/- (रूपये चौदा लाख अठरा हजार पांचशे पन्नास फक्त) चे स्टर्लीग मोटर्स नाशिक यांचे कमीचे दरास व सदर चे बत्तीस चेसीज खेरदी कामी येणारे एकूण रक्कम रूपये १,२६,९१,४४०/-(रूपये एक कोटी सव्वीस लाख एक्याण्णव हजार चारशे चाळीस फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावा.
सुचक :- मा. श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन
अनुमोदक :- मा.सौ. पवार संध्या बाळासाहेब
ऑफिस रिपोर्टा नुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१८**

सन २००७-२००८.

विषय क्रमांक-४ मंगळवार दिनांक २५/३/२००८

ठराव क्रमांक -४ मंगळवार दिनांक २५/३/२००८

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य विभागा करिता घन कचरा व्यवस्थापने अंतर्गत १२ व्या वित्त आयोगाचे प्राप्त निधीतुन कचरा वाहतुकी करिता म.न.पा.ने पुरविलेल्या टाटा ४०७ वाहनांवर बंदिस्त बॉडी बांधकाम करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ .

**प्रस्तावाचा मजकूर :-** विषय-घनकचरा व्यवस्थापनेतंर्गत १२ व्या वित्त आयोगाचे प्राप्त निधीतून कचरा वाहतुकीकरिता महानगरपालिकेने पुरविलेल्या टाटा ४०७ वाहनावर हायड्रो. बंदीस्त बॉडी बांधकाम करणे.

मा.सादर,

आरोग्य विभागाकडील घनकचरा प्रस्ताव दि. १८/१/०८ प्रस्तावास मा.स्थायी समिती ठराव क्र. १३ दि.७/१/२००८ चे मंजुरीनुसार तसेच मा. उप संचालक, नगरपरिषद संचालनालय, मुंबई यांचेकडील दि. २२ जानेवारी २००८ चे पत्रानुसार १२ व्या वित्त आयोगाचे प्राप्त निधीतून घनकचरा व्यवस्थापनेसाठी टाटा ४०७-१५ डंम्पर, डंम्पर प्लेसर-२, कं टेनर २० नग, मिनीमेक-१५ वाहने,२ [ फायर फायटर २ वाहने महानगरपालिकेचे निधीमधून घेणे असल्याने] उर्वरीत वाहनांचे खरेदी कामी तसेच बॉडी बांधकाम करणे कामी वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात येवून फॉर्म विक्री दि. ३१/१/०८ ते ६/२/०८ अशी ठेवणेत आली होती. दि. ७/२/०८ रोजी निविदा स्विकृतीमध्ये प्राप्त निविदा मा.उपायुक्त [कर] यांचे दालनात उघडल्या असता, निविदाकार यांची कागदपत्रे तसेच निविदेतील अवाजवी दर पाहता निविदाधारक यांना निगोसिएशन करणे कामी बोलविण्यांत आले होते. तथापी निविदाधारक यांनी समाधानकारक दर कमी केलेले नसल्याने फेरनिविदा काढणेबाबत आदेश आले आहेत.त्याप्रमाणे मंजूरी घेवून फेर जाहिर निविदा प्रसिध्द करणेत येवून फॉर्म विक्री दि. २७/२/०८ ते दि. ५/३/०८ अशी ठेवणेत येवून प्राप्त निविदा मा.उपायुक्त [कर] यांचे दालनात उघडल्या आहेत. प्राप्त वैध ठरलेल्या निविदांचा तुलनात्मक तक्ता करून मंजूरीसाठी दिला असता कमीचे निविदाकार यांना निगोसिएशन करणे कामी पत्र देणेस आदेश दिल्यानुसार टाटा ४०७ हायड्रो सिस्टीम बनविणे व टाटा एसीई वाहनावर हायड्रो सिस्टीम बसविणे बाबतचे धृव ऑटो क्रॉफ्ट यांचे कमीचे निविद रूपये २,६४,७१८/- व रू. १,४५,३१५/- अनुक्रमे आल्यानुसार दि.११/३/०८ रोजी निगो. बाबत पत्र देवून मा.उपायुक्त [कर] यांचे दालनात निगोसिएशन केले असता टाटा ४०७, वाहनावर बॉडी बांधकामाकरिता ३% तसेच टाटा एसीई वाहनावर १०% दर कमी करीत असल्याबाबत दि. १२/३/०८ रोजी पत्र दिले आहे. टाटा ११०९ चेसीवर डंम्पर प्लेसर व २० नग कंटेनर बसविणे बाबत आवटे फॅब्री, यांचे दर कमीचे आले होते. तथापी निगो. केले बाबतचे त्यांचे पत्र प्राप्त झालेले नाही.

वरीलपैकी टाटा एसीई, टाटा ११०९ डंम्पर प्लेसर बांधणी तसेच कंटेनर बनविणेकामी निविदा दर जास्तीचे आल्याने फेरनिविदा तिसरी काढणेत आलेली आहे. तसेच ध्रुव ऑटो क्रॉफट यांचे टाटा ४०७ वाहनावर हायड्रो बंदिस्त बॉडी बांधकाम करणेकामी निगो. मध्ये आलेले ३% कमीचे दरास रू.२,५६,७७७/- प्रत्येकी प्रमाणे एकूण १५ वाहनांवर बॉडी बांधकाम करणे कामी येणारा खर्च रू. ३८,५१,६५५/- चे खर्चास व कामास मा. निविदा छाननी समितीने शिफारस केलेली असून मंजूरीकरीता मा.स्थायी समितीकडे पाठविणेस शिफारस केलेली आहे. व मा. मुख्यलेखापरिक्षक यांनी मान्यतेस्तव सादर केलेले आहे. मा. मुख्यलेखाधिकारी टाटा ४०७ वाहनावर हायड्रोलिक सिस्टीमचे बंदिस्त बॉडी बांधून घेणे कामी ध्रुव ऑटोक्रॉफ्ट पुणे यांनी वाटाघाटी अंती ३% दर कमी केले असून सदर कामासाठी येणा-या खर्चास ( रक्कम रूपये ३८,५१,६५५/-) निर्णयार्थ मा. स्थायी समिती कडे सादर करणे योग्य राहिल असे मत दिले आहे. त्यावर मा.उपायुक्त (कर)

यांनी टाटा ४०७ महानगरपालिकेने पुरविलेल्या चेसीवर एकूण १५ नगावर बंदिस्त बॅाडी हायड्रोलिक सिस्टीमसह कामाच्या एकूण रू. ३८,५१,६५५/- किंमतीच्या कामास मा.स्थायी समितीकडे शिफारस केलेली आहे. सदर प्रस्तावास मा. आयुक्त साहेब यांनी मंजूरी दिलेली आहे. सबब प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव सादर.

येणे प्रमाण ऑटो इंजिनिअर यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- टाटा ४०७ या वाहनावरच फक्त बॅाडी बांधकाम करावयाचे किंवा कसे.

मॅके.इंजि.श्री. निकम पी.जे.:- सर्वच वाहनावर बॅाडी बांधणेचे काम करावयाचे आहे. टाटा एसीई, टाटा ११०९,डंम्पर प्लेसर बांधणे तसेच कंटेनर बनविणे कामी जादाचे दर आल्याने फेर निविदा मागविलेल्या आहेत. टाटा ४०७ वाहनावर हायड्रो बंदिस्त बॅाडी बांधकाम करणे कामी निगोशिएशन मध्ये आलेले ध्रुव ऑटो क्रॅाफ्ट पुणे यांनी ३% कमी केलेले दराप्रमाणे रू.२,५६,७७७/- प्रतेंकी प्रमाणे एकूण १५ वाहनावर बॅाडी बांधकाम करणे कामी येणारा एकूण खर्च रू.३८,५१,६५५/- चे खर्च मंजूरीस प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. शिंदे द.बा. :- प्रस्ताव मंजूर करावा.

मा.श्री. शेख आरिफ शे.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य विभागाकरिता घनकचरा व्यावस्थापने अंतर्गत १२ व्या वित्त आयोगाचे प्राप्त निधीतुन कचरा वाहतुकी करिता मनपाने पुरविलेल्या टाटा ४०७ वाहनांवर बंदिस्त बॅाडी बांधकाम करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता कमीचे निविदा दर धारक ध्रुव ऑटो क्राफ्ट पुणे यांचे म.न.पाने पुरविलेल्या चेसीवर बंदिस्त बॅाडी हायड्रोलीक सिस्टीम सह बांधणे कामी चे प्रतेकी रूपये २,५६,७७७/-(रूपये दोन लाख छपन्न हजार सातशे सत्याहत्तर फक्त)चे दरास व त्या प्रमाणेचे एकूण पंधरा वाहनावर बॅाडी बांधकाम करणे कामी येणारे एकूण रूपये ३८,५१,६५५/- (रूपये अडत्तीस लाख एक्कावन्न हजार सहाशे पंचावन्न फक्त )चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावा.

सुचक :- मा.श्री. शिंदे दशरथ बाबू

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन

ऑफिस रिपोर्टा नुसार ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका.

अहमनगर महानगरपालिका,अहमदनगर.
इलेक्ट्रिक विभाग
दिनांक - २३/४/२००८

**विषय** :-अहमदनगर महानगरपालिका हद्दीत अस्तित्वात असलेल्या स्ट्रीट लाईट फिटींगचे येणारे वीज बील कमी करणे करितां उर्जा कार्यक्षम उपकरणे / नविन तंत्रज्ञान यांचा वापर करून बी ओ टी तत्वावर राबविणेस देणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट .

सादर ,

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती करणेत येते कि , अहमदनगर महानगरपालिकेने अहमदनगर महानगरपालिका हद्दीत अस्तीत्वात असलेल्या स्ट्रीट लाईट फिटींग्ज द्वारे येणारे वीज बल कमी करणे करिता नविन उर्जा कार्यक्षम उपकरणे /नविन तंत्रज्ञान यांचा वापर करून BOT तत्वावर राबविणे कामी वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करून निविदा मागविण्यांत आल्या होत्या. सदर कामी एकूण खालील प्रमाणे तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

१. सहस्त्रोनिक प्रा.लि.नाशिक
२. कृपा स्टील इन्डस्ट्रीज,नाशिक
३. एशियन इलेक्ट्रॉनिक्स,ठाणे

विषयांकीत कामी प्राप्त झालेल्या निविदा धारकांनी त्यांचे कडील उत्पादनानुसार व तांत्रिक स्पेशिफीकेशन नुसार उपकरणे वापरून वीजबचत करणार असल्याचे नमूद केलेल्या थेट तुलना करता येत नसल्याने याबाबत मेडा,पुणे यांचेकडेही निविदा अभिप्रायासाठी पाठविण्यात आलेल्या होत्या.परंतु मेडा कडे पुरेसे मनुष्यबळ नसल्याने त्याबाबत मनपा स्तरावर निर्णय घेणेस्तव कळविलेले होते. या अनुषंगाने गठीत समिती समवेत समक्ष चर्चा करून निर्णय घेण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारकांशी गठीत समितीसमवेत संयुक्त चर्चा करणे साठी मा.आयुक्त साहेब यांचे दालनात दिनांक २८/११/२००७ तसेच दि.१३/१२/२००७ रोजी (मा.उपमहापौर साहेब व मा.आयुक्त साहेब यांचे दालनात ) बैठक आयोजित करण्यांत आली होती.

गठीत समितीतील सदस्य तसेच वरील तीनही निविदा धारकांचे प्रतिनिधी,इलेक्ट्रीकल विभाग प्रमुख यांचे एकत्रित मा.आयुक्त साहेब यांचे दालनात व मा.उपमहापौर साहेब यांचे दालनात यांचे दालनात चर्चा झाल्या.

तसेच या बाबत दि. २७/१२/२००७ रोजी झालेल्या छाननी समितीने हि प्रोजेक्टचा उदेश,होणारी जास्तीची बचत,एजन्सी ची क्षमता,वापरण्यात येणारे तंत्रज्ञान या बाबत सविस्तर चर्चा करून सदरचे काम एशियन इलेक्ट्रॉनिक्स,ठाणे यांचे मार्फत करण्यास हरकत नाही. असे अभिप्राय दिलेले आहेत

प्राप्त तीनही निविदापैकी एशियन इलेक्ट्रॉनिक्स,ठाणे यांनी वीज बचती विषयी मांडलेले -मुद्दे तसेच या संस्थेने इतर महानगरपालिकेकडे केलेल्या कामांचा अनुभव,त्यांची आर्थिक गुंतवणुकीची क्षमता पाहता याबाबत कृपा स्टील इंडस्ट्रीज व सहस्त्रोनिक प्रा.लि. यांनी वीज बचती विषयी मांडलेल्या मुद्यापेक्षाही संयुक्तीक व महानगरपालिकेच्या दृष्टीने आर्थिक हितावह वाटतात. याबाबत छाननी समितीनेही शिफारस केलेली आहे. त्यानुसार वीज बचत प्रकल्पाचे काम एशियन इलेक्ट्रॉनिक्स या कंपनीस देणे बाबतचा विचार करून वीजबचत प्रकल्प राबविताना खालील बाबी प्रामुख्याने विचारात घेणे जरूरीचे वाटते. अशा बाबत सविस्तर ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त साहेब मा.आयुक्त साहेब, यांचे कडे सादर करण्यांत आलेला होता.

१. वीजबचत प्रकल्पात एकाच प्रकारचे फिटींग्ज लागल्यास शहर सुशोभिकरणाच्या दृष्टीनेही विचार होवू शकतो.
२. वीज बचतीची एकच पध्दत वापरल्याने नेमकी किती विज बचत होते. हे कळणे व सुटसुटीत होईल.
३. वीज बचत प्रकल्प राबवितांना संबधीत एजन्सी कडून देखभाल/दुरूस्तीचे काम विनामूल्य करून घेणे उचीत असून यावर महानगरपालिके मार्फत सध्याचा कर्मचारी वर्ग देखरेखी करीता अथवा संयुक्तपणे नेमणे योगय वाटते.
४. वीज बचत प्रकल्प राबविणा-या कंपणीच्या माध्यमातून मिळणा-या कार्बन क्रेडीटचा लाभ महानगरपालिकेस मिळावयास हवा.
५. BIS नॉर्म्स प्रमाणे Lux - level राबविण्यात यावी.
६. भविष्यात वाढणारे फिटींग्ज कंपनी मार्फतच लावण्यात यावेत. बचतीच्या सुत्रानुसार मोबदला देणे योग्य.

सदरचे ऑफिस रिपोर्ट नुसार मा.आयुक्त साहेब, यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय नमूद करून मा. स्थायी समिती समोर सदरचा विषय ठेवणे बाबत आदेश देण्यांत आलेले आहे.

१. तीनही कंपनीची तांत्रिक पध्दत वेगवेगळी आहे. हि पाहण्यासाठी मनपाकडे सक्षम यंत्रणा दिसून येत नाही.
२. सदरचे निविदाही BOT तत्वावर आहे ESCO प्रोजेक्ट नाही.
३. करारनामा हा महानगरपालिकेच्या अटीनुसारच करणे बंधनकारक राहील. त्याचा ESCO अकौंन्ट राहणान नाही.
४. कोणत्याही परिस्थितीत आता मिळणा-या रोडवरील लाईटचा प्रकाश कमी होता कामा नये.
५. तसेच मनपाच्या आताच्या फिटींग्ज जवळजवळ (१३००) त्याचे काय करणार ? त्याचा काही प्लॅन खात्याने सादर केलेला नाही.
६. कार्बन क्रेडीट बद्यलसर्व रक्कम ही महानगरपालिकेस मिळाली पाहीजे.
७. या सर्व योजनेमध्ये महानगरपालिकेचा कोणतीही खर्च राहणार नाही. उलट महानगरपालिकेचा फायदा झाला पाहीजे तसेच नागरीकांना जी सेवा आता मिळते. तशीच किंवा यापेक्षाही जास्ती मिळाली पाहीजे.
८. सर्व फिक्शचर म्हणजेच बल्ब  व इतर सर्व मटेरीयल संबधीत कंपनीनेच वेळच्यावेळी बसवावेत त्याचा कोणताही मोबदला महानगरपालिका देणार नाही.
९. महानगरपालिकेशी याकामी केलेल्या करारनाम्यावर कोणत्याही प्रकारचे कर्ज कंपनीस काढता येणार नाही.

येणे प्रमाणे सविस्तर अहवाल मा.स्थायी समिती कडेस सादर केला असता त्यावर मा.स्थायी समिती सभा दि.७/१/२००८ ठराव क्रं.१० अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत आलेला आहे.

अहमदनगर महानगरपालिका हद्यीत अस्तित्वात असलेल्या स्ट्रीट लाईट फिटींगचे येणारे वीज बील कमी करणे करिता उर्जा कार्यक्षम उपकरणे / नविन तंत्रज्ञान याचा वापर करून बी ओ टी तत्वावर राबविणेस देणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्टावर सभेमधील चर्चे मध्ये सहभागी असलेल्या स्थायी समितीचे सदस्यांचेविचार, मत घेवून सर्वानुमते आलेले कमीचे निवीदा दर धारक कृपा स्टील इंडस्ट्रीज नाशिक यांची निविदा मनपाचा आर्थिक फायदा करणारी असल्याने मंजूर करण्यांत येत आहे.

वरील प्रमाणे स्थायी समितीने ठराव मंजूर केलेला असून सदर ठराव महानगपालिकेच्या आर्थिक हिताचा नसल्याने मा.उपमहापौर साहेब,मा.सभापती स्थायी समिती व मा.श्री भानुदास कोतकर व मा.श्री शेख आरिफ यांनी यादी देवून मा.स्थायी समितीने केलेला ठराव मनपाच्या आर्थिक हिताचा नसल्याने सदर विषय मार्गी लावणे साठी प्रस्ताव येत्या स्थायी समिती मध्ये सविस्तर माहिती सह फेर विचारार्थ तातडीने घेणे विषयी विनंती सुचना केलेली असून मा.स्थायी समिती सदस्य मा.श्री कोतकर भानुदास एकनाथ व मा.श्री शेख आरिफ शेख रफिउद्यीन यांचे दिनांक ११/३/२००८ चे यादीवर मा.स्थायी समिती सभेने ठराव पारीत करून सदर बाबतीत फेर प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे सादर करणेचे सुचित केलेले असून सदर प्रकरणी प्राप्त निवीदा पैकी एशियन इलेक्ट्रॉनिक्स ठाणे यांचे निविदास मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव मा.स्थायी समिती कडेस आदेशार्थ सादर.

इले.सुपरवायझर ,<br>
अहमदनगर महानगरपालिका.